REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# भारताची सामुद्रिक घेरेबंदीच्या संदर्भात चीनची रणनीती व भारताच्या सामुद्रीक समस्या

**प्रा. डॉ. एन. झेड. पाटील**
**प्रमुख संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग**
**के.एन.बी. कला महाविद्यालय, नवलनगर, ता.जि. धुळे.**

**प्रस्तावना :-**

भारतीय उपमहाव्दिपचा इतिहास प्राचीन काळापासून हिंदी महासागरामुळे प्रभावीत झालेला आहे. त्याचे कारण असे आहे की, भारत तिनही बाजूने सागराने वेढला असल्याने आपला बहुतांशी व्यापारही सागरावरच अवलंबून आहे. वास्तविक क्रिस्तोफर कोलंबसने अटलांटीक महासागर पार करण्याआधी अनेक शतकांपूर्वी हिंदी महासागर पूर्वेला चीन व पश्चिमेस भूमध्यसागरीय देशांना जोडून वाणिज्य व सांस्कृतिक आदान-प्रदान करण्याची महत्त्वपूर्ण भूमिकेचे निर्वाहन करत आला आहे. बंगालच्या खाडीतून सहाव्या शताब्दी पर्यंत मौर्य व आंध्र राजवंशाने आपला सामुद्रिक एकाधिकार स्थापन करुन मलाया, सुमात्रा तसेच जावा आदी क्षेत्राव्यतिरिक्त प्रशांत महासागराचे काही क्षेत्रात आपली गुंतवणूक स्थापन करुन संपूर्ण हिंदी महासागर क्षेत्रात आपले प्रभुत्व टिकवून ठेवले. जरी पाचव्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत मलाक्काची समुद्र धुनीच्या मध्यापर्यंत राजवंशाचा एकाधिकार कायम होता. परंतू अकराव्या शतकात चालवंशाकडून केल्या गेलेल्या सफल नौसैनिक कार्यवाहिमुळे राजवंशाचे शासन समाप्त करुन आपले वर्चस्व मात्र स्थापन करुन घेतल. परंतु नंतर हिंदू साम्राज्य कमजोर झाल्यामुळे तेराव्या शतकात या संपूर्ण सामुद्रीक क्षेत्रावर मुस्लीमचे प्रभुत्व स्थापन झाले. त्यानंतर तीन शतकापर्यंत भारताच्या सीमावर्ती सामुद्रीक क्षेत्रावर अधिकार व नियंत्रणासाठी जे प्रयत्न चाललेत त्यात शेवटी 1803 मध्ये ट्रेफाल्गारची निर्णायक लढाईत ब्रिटनने फ्रान्सला पराजित करुन संपूर्ण हिंदी महासागरावर नियंत्रण प्राप्त करुन त्याला 'ब्रिटीश-झील' च्या रुपात परावर्तीत केले. परंतू दुसऱ्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर ब्रिटनकडून मलायाला सोडून उर्वरित सर्व आशियात आपली शक्ती एकवटण्याच्या परिणाम स्वरुप जी पोकळी निर्माण झाली त्याची पूर्ती भारत, श्रीलंका व पाकिस्तानसारख्या नवोदित राष्ट्राकडून न होऊ शकल्याने येथे अमेरिका व सोवियत रशिया सारख्या महाशक्तींना प्रवेश करण्यास संधी प्राप्त झाली. त्यामुळे संपूर्ण क्षेत्राची शांती, सुरक्षा व स्थिरतेसाठी गंभीर संकट निर्माण झाले.

**भू-सामरिक स्वरुप :**

हिंदी महासागर फक्त भारतालाच नाही तर संपूर्ण दक्षिण पूर्वी आशिया, पश्चिम आशिया व पूर्वी तसेच दक्षिण अफ्रिकेच्या किनाऱ्याला स्पर्श करतो. एवढेच नाही तर या क्षेत्रातील राष्ट्रांची भू-राजनीती, अर्थव्यवस्था, व्यापार, विदेशनीती तसेच सामुद्रीकच्या निर्धारणपणात एक निर्णायक व प्रभावी तत्व आहे. जवळ-जवळ 73.6 मिलियन वर्ग कि.मी. क्षेत्रात विस्तृत या महासागराची किनारपट्टी जवळ-जवळ 66225 कि.मी. लांब आहे. तसेच तो तीन महाव्दिपात आफ्रिका, आशिया व ऑस्ट्रेलिया या तिनही खंडानी घेरला गेलेला आहे. हिंदी महासागर क्षेत्रात जवळ जवळ 45 देश येतात. त्यात 6 व्दिपीय राष्ट्र (Island States) आहेत. प्रचंड खनिज संपदेने युक्त या महासागरात प्रवेश करण्यासाठी क्रमश: मलाक्का तसेच वेब-एल-मेंडवेचे तंग सामुद्रधुनी (Strait) आहे. हिंदी महासागराचा बराचसा भाग उष्ण कटिबंधात असल्या कारणाने या क्षेत्रात सामुद्रिक दळण वळण कमी आहे. हिंदी महासागरात असलेले अंदमान निकोबार, मालव्दिप, लक्षव्दिप, सोशिलीज, मॉरिशय, छागोस तसेच सुमित्रा सारख्या बेटामुळे हे क्षेत्र सामरिक दृष्टीने अत्यंत संवेदनशील आहे.

हिंदी महासागरात आर्थिक, व्यापारिक, सामरिक, भू-राजनैतिक विविधता व संवेदनशिलतेत खालील रोधक स्थानांची (Choke point) ची विशेष भूमिका आहे.



1. सुवेझ कालवा : भुमध्यसागर व लाल सागराला जोडणारा हा महत्त्वपूर्ण कालवा पूर्व व पश्चिमेच्या मध्यात असल्याने व्यापारी दृष्टिने महत्त्वपूर्ण मार्ग आहे. 103 मैल लांब हया कालव्या मार्गे हिंदी महासागरात जवळ जवळ 12 हजार पेक्षाही जास्त व्यापारी जहाजे दरवर्षी जातात. उत्तर अमेरिका, जपान, ब्रिटन, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया व न्युझिलंडसारखे विकसित देशांना हा कालवा जागतल्या विकसनशील राष्ट्रांना जोडतो.

2. फारसची खाडी : अरबी समुद्राला संलग्न खाडीचे हे क्षेत्र हिंदी महासागराची भू-सामरिक व भू-राजनीतीला सर्वाधिक प्रभावित करतो. या क्षेत्रातील विशाल खनिज तेल संपदा तसेच खाडी युध्दाचे (1991-2003) फलस्वरुप येथे अमेरिकेच्या सैन्य उपस्थिती वाढत जात असल्यामुळे सागराचे महत्तव अधिकच वाढवून दिले आहे. पश्चिम आशियाची समस्या तसेच तेल-राजनीतीत अमेरिकेचा वाढता हस्तक्षेप वर्तमान काळातील सर्वात चिंतेचा विषय आहे.

3. बाब-अल-मंडेव :अरबी सागर व लाल सागराला जोडणारे हे क्षेत्र हिंदी महासागराच्या शक्ती स्पर्धेत अत्यंत संवेदनशील आहे. मुख्यतः आशियाई किनारी क्षेत्र तसेच आफ्रिकी किनारी क्षेत्रात विभक्त या क्षेत्रातील सोमालिया, इथियो पिया, सुदान, यमन व सऊदी अरब सारखे महत्त्वपूर्ण देशात सैन्य आधार विकसित करण्यासाठी महाशक्तींच्या मध्ये सुरु असलेल्या स्पर्धेत सैन्य समिकरणांना जटील बनविले आहे. या क्षेत्रातील भू-राजनैतिक व भू-सामरिक स्थिती, अरब-इस्त्रायल संघर्षाच्या प्रकृतीवर विशेष प्रभाव टाकला आहे. येथील सीमा तंटयात अमेरिका रुस व चीन सारख्या बाहेरील शक्तीची वाढत चाललेली अभिरुची हिंदी महासागरातील शक्ती स्पर्धेला नविन आयाम देत आहे.

4. मलाक्काची समुद्रधुनी : ही समुद्रधुनी पूर्व व पश्चिमी देशांमध्ये संपन्न होणाऱ्या व्यापारी मार्गात असल्या कारणाने सामरिक व व्यापारिक दृष्टिने याचे विशिष्ट महत्त्व आहे. प्रशांत व हिंदी महासागराच्या मध्ये महाशक्तीच्या मध्ये होत असलेल्या स्पर्धेतील मुख्य रोधक बिंदुच्या भूमिकेचे निर्वहन करणाऱ्या या सामुद्रधुनीमध्ये हिंदी महासागरीय शक्ती राजनीतीत महत्त्वपूर्ण स्थान आहे. याचे प्रायव्दिपीय स्थानामुळे हिंदी महासागराचे भू-राजनैतिक व रणनीतीक महत्त्वात अदभूत अशी वाढ झालेली आहे. भारताची भू-सामरिक स्थिती तसेच अभिरुचीच्या दृष्टिने संपूर्ण हिंदी महासागराला खालील उपविभाग विभागीत केले जाऊ शकते.

1. बंगालच्या खाडीचे क्षेत्र : अंदमान निकोबार समुद्र व मालाक्काची समुद्रधुनीपर्यंत विस्तृत या क्षेत्रात दक्षिणपूर्व आशिया व आशिया प्रशांत क्षेत्रात स्थित राष्ट्रांव्यतिरिक्त बांग्लादेश व म्यांमार सारखे राष्ट्रांची महत्तपूर्ण भू-राजनीती व भू-आर्थिक स्थिती भारताच्या सुरक्षेशी प्रत्यक्ष जुळली आहे. या महत्त्वपूर्ण क्षेत्रात विस्तृत विशिष्ट आर्थिक क्षेत्र (EEZ) व कॉण्टीनेण्टल शेल्फ ( Countinental Shelf) ची सुरक्षा संवेदनेला परिणाम आहे की, भारताने अंदमान निकोबार व्दिप समुहाला या क्षेत्रातील मुख्य सामरिक आधाराच्या रुपात विकसित करण्याची दीर्घकालीन रणनितीला आपली सामुद्रीक सुरक्षा नीतीत प्रमुखता दिली आहे. 'पूर्वेकडे पहा' (Look east policy) वर आधारीत भारताची सामुद्रिकनीतीच्या परिणाम स्वरुप या क्षेत्रात भारताची वाढत असलेली अभिरुची तसेच क्षेत्रिय सुरक्षेच्या वाढत जाणाऱ्या धोक्यांना निष्प्रभावी करण्याच्या त्यांच्या उत्सुकतेमुळे हे क्षेत्र अत्यंत संवेदनशील होत आहे. या संदर्भात प्रो. के.आर. सिंहचे खालील कथन प्रासंगिक आहे.

"Today India is accepted as a reliable and friendly regional partner of these states That gives India a political and diplomatic base of natutralize possible threats to its security emanating from the region or from one parts of Asia-pacific. It will not wrong to sya That these regional partners constitute the first line of defence for India just as India constitute their strategic partner. "

## 2. केंद्रीय हिंदी महासागर क्षेत्र :

या क्षेत्रात मालदीव व श्रीलंकासारखे महत्तपूर्ण देश आहेत. जे भारताच्या सामुद्रीक सुरक्षेत महत्त्वपूर्ण स्थानी आहेत. हे क्षेत्र खालील कारणंनी महत्त्वपूर्ण आहे.

1) हिंदी महासागर क्षेत्र जगातील अनेक महत्वपूर्ण संचार मार्गांना एक दुसऱ्याला जोडतो.
2) अरबी समुद्र व बंगालच्या उपसागरामध्ये भारताच्या किनारी क्षेत्राच्या दृष्टिने संपर्क सेतुचे काम करतो.
3) या क्षेत्रात होणाऱ्या विविध घटनांना (विशेषतः दहशतवाद) भारताच्या घरगुती व सुरक्षा धोरणांना प्रभावित करतो.

अरबी समुद्र व त्याच्या विस्तृत क्षेत्रात उत्पन्न सुरक्षा आव्हाने भारताच्या सुरक्षेला प्रत्यक्षात प्रभावित करतात त्याचप्रमाणे भारत व पाकिस्तान मध्ये सुरु असलेल्या स्थिर स्पर्धेमुळे या क्षेत्रात उत्पन्न उर्जा सुरक्षा तसेच सामुद्रीक व्यापारिक रेषेची सुरक्षा भारतासाठी गंभीर चिंतेचे असे विषय आहेत. जे या क्षेत्रातील रक्षा उत्तेजनांना निरंतर प्रभावित करत आहेत. ईराण पासून मध्य आशिया व रुस पर्यंत जाणाऱ्या उत्तर-पूर्व खाडी क्षेत्राशी संलग्न हिंदी महासागराचे हे क्षेत्र भू-राजनैतिक दृष्टीने सर्वाधिक महत्त्वपूर्ण आहे. कारण या क्षेत्रात सुरु असलेल्या आंतरराष्ट्रीय दहशतवादी कारवाया तसेच कट्टर इस्लामीक तत्वाचा वाढत असलेला प्रभाव क्षेत्रिय सुरक्षा समीकरणांना प्रभावित करत आहेत. अमेरिकी प्रभुत्त्वाच्या अंतर्गत येणारे राष्ट्रांच्या विपरीत येथील सामरिक व आर्थिक कारवाया भारताच्या धर्मनिरपेक्षता बरोबर परराष्ट्र धोरणावर खोलवर परिणाम करत आहेत.

## 3. पश्चिम हिंदी महासागर क्षेत्र :

या क्षेत्रातील आफ्रिकेतील किनारी देश मॉरिशय व सेचेल्स व्दिपीय राष्ट्र युध्दनितीक दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण अमेरिकेचे दिएगोगार्शिया बेट समाविष्ट आहेत. रणनीतीक व आर्थिक दृष्टीने महत्त्वपूर्ण या क्षेत्रात मॉरिशय, सेचेल्स व रियनियनबेटाबरोबर भारताचे आर्थिक संबंध अवश्य आहेत. परंतु दिएगोगार्सियाच्या माध्यमाने या संपूर्ण क्षेत्राची भू-राजनीतीने अमेरिकी वर्चस्व स्थापन झाल्याचे फलस्वरुप या क्षेत्रात रक्षा उत्तेजनेला सदैव नवीन उर्जा मिळत आहे.

## जागतिक शक्तींचे अड्डे :

दुसऱ्या महायुध्दानंतर साम्राज्यवादाच्या तावडीतून मुक्त होणाऱ्या राष्ट्रांना आपआपल्या प्रभावाखाली आणण्याच्या स्पर्धेने आशियाला महाशक्तींच्या शक्ती प्रति स्पर्धेचा केंद्रबिंदू बनवून टाकले आहे. युध्दानंतर आर्थिकदृष्टया जर्जर ब्रिटन शेवटी गुंतवणूकदारांवर आपला दबाव पूर्वीप्रमाणेच नियमित ठेवण्यात स्वतःला असमर्थ समजू लागला. त्यामुळे ब्रिटनव्दारे 'स्वेजच्या पुर्वेला' अशी नीती घोषित करण्याचे हिंदी महासागरामुळे निर्माण झालेली पोकळीच्या पूर्ततेसाठी महाशक्तींकडून या क्षेत्रातील प्रवेशाला गती मिळाली. महाशक्तींच्या या कार्यवाहिमुळे हिंदी महासागरात शक्ती स्पर्धेचा अशा युगाला सुरुवात झाली. त्यामुळे या क्षेत्राला तणावग्रस्त बनवून टाकले आहे. येथे खालील देशांमध्ये सामरिक अड्डे आहेत.

### 1. अमेरिका :

भू-राजनैतिक युध्दनीतीक दृष्टीकोणाने जरी या क्षेत्रात आधिकार प्राप्त केले. परंतु त्यानंतर अमेरिकेने या क्षेत्रात प्रवेश केला. सन. 1965 मध्ये ब्रिटीश सचिव श्री. ॲन्योनी ग्रीनवूड यांनी ही घोषणा केली की, अमेरिका व ब्रिटन यांनी संयुक्तपणे BIOT(British Indian Ocean Territory) ची निर्मिती करुन येथे सुरक्षात्मक दृष्टीकोनाने संचार अड्डयाची स्थापना करतील. या नवीन कॉलनीचे केंद्र सेशेल्टचे विक्टोरिया नावाच्या ठिकाणावर आहे. ज्या खालील क्षेत्र येतात.

वर्तमानात दिएगोगार्शियाच्या बेटावर अमेरिकेने खालील प्रकारच्या संचार व सैन्य सुविधा विकसित केल्या आहेत.

1) Navy Support Facility (NSF)
2) Navel Computer and Telecommunication Staions (NCTS)
3) Navy maritime prepositioning ship
4) Military sealift command Dvit
5) Patrol squradron
6) Patrol wing, one Detachment
7) Detachment 4, 18$^{th}$ space surveillance command
8) Detachment 8, 750 space Group
9) Defence Mapping Agency

दिएगोगार्शियाच्या व्यतिरिक्त पश्चिम व पूर्वी हिंदी महासागर लगतच्या पुढील देशांमध्ये अमेरिकेचे नौसैनिक व हवाई सुविधा निर्माण केल्या आहेत.

**बहरीन :-** स.न. 1949 मध्ये हा देश अमेरिकेच्या मध्य-पूर्व सैन्य शक्तीचा प्रमुख आधार होता. तसेच आज हाच देश अमेरिकेच्या पाचव्या आरमाराचा मेजवान देश आहे. येथे सन 1998 पासूनच तीस अमेरिकी F-16, F-15, दोन बी-1 बॉम्बर तसेच 4 के.सी. 135 टँकर्सना सुविधा प्राप्त अहे. अमेरिका व बहरिनच्या मध्ये स.न. 1991 मध्ये सरंक्षण-सहकार्य समझोता संपन्न झाला. त्याअंतर्गत अमेरिकेला तेथे नौ व हवाई सुविधा नेहमी मिळत राहतात.

**ओमान :-** ओमान व अमेरिका यांच्यात स.न. 1980 मध्ये झालेल्या सरंक्षण समझोत्यानुसार ओमानच्या दक्षिणी भागात स्थित थुमरेट (Thumrait) मध्ये अमेरिकेला हवाई सुविधा उपलब्ध आहे. तसेच त्या बदल्यात अमेरिका ओमानला अत्याधुनिक सैन्य साहित्याची मदत पुरवत आहे.

**तार :-** सन 1991 मध्ये अमेरिकेने दोहा येथे एक सैन्य सपर्क कार्यालय स्थापन केले होते. तसेच जून 1992 मध्ये दोन्ही देशांदरम्यान संरक्षण समझोत्यानंतर कतारमध्ये अमेरिकेला अवचित ब्रिगेडसाठी सैन्य सुविधा प्राप्त होत आहे.

**सौदी अरब :-** या क्षेत्रातील हा अमेरिकेचा सर्वाधिक महत्त्वपूर्ण सामरिक सहकारी देश सन 1998 पासून सौदी अरबचा प्रिन्स सुल्तान हवाई आधारावर 30 अमेरिकी F-15, 16, RC-135 विमान, U-2 निगरानी विमान तसेच 6 सी -130 विमानांना सर्व प्रकारची सुविधा प्राप्त आहे.

**संयुक्त अरब अमिरात :-** जुलै 1994 मध्ये अमेरिका व संयुक्त अरब अमिरात यांच्यात झालेल्या सरंक्षण सहकार्य समझोत्याच्या आधारावर अमेरिकी जहाजांना आबुधाबी, फुजेरा, दुबई आणि जुबेरअलीमध्ये नौसैन्य सुविधा मिळत आहे.

**मिस्त्र :-** मिस्त्र व त्याची विमानतळे अमेरिकेबरोबर त्यांच्या होत असलेल्या संयुक्त सैन्य अभ्यासासाठी उपलब्ध करुन देत आहे. तसेच दोन्ही देश संयुक्त मानवीय सहायता कार्यक्रमासाठी सरंक्षण संपर्क स्थापन करुन एकमेकांना मदत करत आहेत.

**केनिया :-** या देशात अमेरिकेला सर्व प्रकारची महत्वपूर्ण सैन्य सुविधा प्राप्त आहे. 1990 च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात सोमालीया आणि खाण्डान संयुक्त राष्ट्राची कार्यवाहिसाठी अमेरिका, केनियत स्थित मोम्बासा आणि नैरोबीमध्ये सैन्य सुविधा प्राप्त करुन देत आहे.

**पाकिस्तान :-** अरबी समुद्राच्य तटावर स्थित पाकिस्तान अमेरिकेचा विश्वस्त सहकारी तसेच 'फ्रण्ट लाईन राज्य' आहे. कराची व ग्वादर येथे अमेरिकेला सैन्य सुविधा मिळत आहे. 'प्रेसलर-संशोधन'मुळे अमेरिकेने पाकिस्तानला F-16 विमान तर दिले नाहीत. परंतु वेळोवेळी दिलेल्या अनुदानाव्यतिरिक्त जून 2003 मध्ये 3 अरब डॉलरची मदत राशी दिली आहे.

**सिंगापूर :-** सन 1990 मध्ये अमेरिका व सिंगापूर यांच्यात झालेल्या संरक्षण समझोत्याच्या आधारे अमेरिकेला तटीय सुरक्षा प्रशिक्षण व संचार सुविधा मिळत आहेत. एवढेच नाही तर.. सिंगापूर, अमेरिकेचा सातव्या आरमाराला संरक्षण तंत्र व डागडुगी सुविधा व्यतिरिक्त इतर विमान जहाजे पाणबुडया व इतर लढाऊ जहाजांसाठी सुविधा उपलब्ध करुन देत आहे. चांगी नौसेना आधार या दृष्टिने सर्वाधिक महत्वपूर्ण आहे.

**थाईलँड :-** या क्षेत्रात थायलँड अमेरिकेचा मुख्य सहकारी देश आहे. दोघांमध्ये सन 1954 'मनिला ॲक्ट' ज्याला नंतर 'सीटो' सज्ञा दिली गेली होती. त्याअनुसार आजसुध्दा अमेरिका थाईलँडच्या सुरक्षेकरीता वचनबध्द आहे. या क्षेत्रात थाईलँड अमेरिकी हितंच्या रक्षणासाठी सर्व प्रकारची सैन्य सुविधा व अन्य सुविधा उपलब्ध करत आहे. तसेच स्वत: त्यानेसुध्दा नौसैन्य लाभार्थ्यात आवश्यक वाढ केली आहे.

**ऑस्ट्रेलिया :-** सन 1951 मध्ये अमेरिका, ऑस्ट्रेलिया व न्यूझिलँड यांच्यात संपन्न सुरक्षा संधी 'अन्जुस' ( ANZUS) च्या व्दारे संधीकर्ता देश एक दुसऱ्याच्या सहकार्यासाठी वचनबध्द आहेत. ऑस्ट्रेलियाच्या जमिनीवर आधुनिक सैन्य सुविधा उपलब्ध आहेत. तसेच दोन्ही देशांची नौसेना व हवाई सेनेमध्ये सतत सैन्य अभ्यास या क्षेत्रात सुरु असतो 'कोबरा गोल्ड' (Cobra Gold) तसेच सी ईगल (Sea Eagle) नौसेना अभ्यास या दृष्टीने उल्लेखनीय आहे.

**फ्रान्स :-** फ्रान्सला जिबौती, रियुनियन, डिगास्वारेज, टनारिव, कोजेर, कोराग्युलेन तसेच एक्सटर्नमध्ये वायू व नौसैनिक सुविधा उपलब्ध आहे. माएटी (Mayotee) मध्ये फ्रान्स सुध्दा सुविधा प्राप्त करण्याचा प्रयत्न करत आहे.

हिंदी महासागर क्षेत्रात चीनची सामरिक व आर्थिक महत्त्वाकांक्षा तसेच भारतीय सुरक्षा परिदृश्य :

The Art of War या सुनझूने लिहलेल्या ग्रंथात वर्णन केल्यानुसार चीनची रणनीती-संस्कृती तसेच आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या गतिमान प्रतिमानाच्य दृष्टीनुसार चीनकडून निर्धारित सामरिक व आर्थिक नीतीच्या फलस्वरुप चीन निरंतर सुदृढ व प्रभावी राष्ट्राचा दर्जा प्राप्त करत आहे. त्याची निरंतर वाढत असलेली क्षमतेच्या दृष्टीने खालील गोष्टी महत्त्वपूर्ण आहेत.

1) स्थिर सरकारचे अस्तित्व (Regime Stability & Servival)
2) देशांतर्गत स्थिरतेला सुरक्षित करण्याची गरज ( Need of prese rve domestic stability)
3) प्रादेशिक अखंडतेला सुरक्षित करण्याच निर्णायक महत्त्व (Crucial Importance to secure territorial integrety)

चीनच्या सामुद्रीक नीतीच्या संदर्भात विचार केला तर असे दिसून येते की, चीनने क्षेत्रिय सुरक्षा व शक्ती-संतुलन समिकरणांना लक्षात घेऊन सामुद्रिक व शक्तीचे आधुनिकीकरणाची प्रक्रिया हाती घेतली आहे. दहशतवादी, संघटीत अपराध तसेच सामुद्रीक डकैती इत्यादी तत्वांवर अंकुश लावण्यासाठी व आपले सागरीय हिताच्या रक्षणासाठी चीनने दक्षिण चीनी सागरात शक्ती प्रक्षेपणावर लक्ष केंद्रित केले. तसेच आशिया क्षेत्रात सामरिक-श्रेष्ठतेच्या स्थापनेत प्रभावी भुमिकेने निर्वहन करण्यासाठी मुख्य व्यापारीक व सागरीय मार्गांवर नियंत्रणासाठी इंडो पॅसिफिक (Indo-pacific) क्षेत्रात आपल्या सागरी हालचाली त्वरीत सुरु केल्या. त्यामुळे टोकियो-अमेरिका रणनितीक भागिदारीला संतुलीत करण्यासाठी चीनने उत्तर कोरियाच्या शास्त्रोक्त आण्विक कार्यक्रमाला तर सहाय्यता पोहचविली. त्याचबरोबर शीतयुध्दानंतरच्या काळात आशिया संदर्भात भारत-अमेरिका-जपान-ऑस्ट्रेलिया यांच्यात वाढत असलेला सामरिक व आर्थिक संबंधाच्या दृढतेला लक्षात घेऊन चीनने हिंदी महासागराच्या क्षेत्रिय देशांबरोबर सामरिक-राजनीतीक मैत्रीवर लक्ष केंद्रीत केले. वास्तविक आर्थिक विकासासाठी सामुद्रीक व्यापारावर चीनच्या अवलंबित्वाचाच हा परिणाम आहे की, सामुद्रिक संचार रेषांच्या सुरक्षेबरोबर हिंदी महासागराचे सर्व रोखक ठिकाणांवर नियंत्रण करण्यासाठी चीन गंभीरतापूर्वक प्रयत्न करत आहे. त्याचे कारण असे आहे की, पश्चिम आशिया व आफ्रिकाकडून चीनमध्ये जे तेल आयात केले जाते त्याचा जवळ जवळ 80 टक्के हिस्सा हिंदी महासागर मार्गेही होतो. पी.एल.ए. (PLA) चा प्रमुख क्विन गुलियाग (Qian Guoliang) याने सन 2000 मध्ये ताईवानला चीनच्या सुरक्षेत संवेदनशील म्हणताना अशी शंका प्रकट केली होती की, हिंदी महासागराला जुडणारे संचार मार्गावर जर चीन नियंत्रण स्थापन करुन घेईन तर फक्त मध्यपूर्व क्षेत्रातून येणारे तेल टँकर धोक्यात येतील, असे नाही तर ताईवानमध्ये सैन्य शक्तीच्या वापरासाठी चीनला कठिनाईचा सामना करावा लागला.

वास्तविक चीनच्या सरकारने आपल्या राष्ट्रीय सुरक्षा उद्देशासाठी विशेष करुन क्षेत्रिय बेटांवर आपल्या अधिकार संबंधी अधिकाराच्या पूर्ततेसाठी नौसेनेच्या उपयोगात कोणत्याही प्रकारचा संकोच केला नाही. क्षेत्रिय प्रभुत्त्व हा चीनचा असा राग आहे की, त्याची पूर्तता करण्यासाठी चीन नेहमी आक्रमक कुटनीतीसाठी तत्पर असतो. चीनची सागरी सुरक्षा रणनितीच्या संदर्भात खालील विवाद उल्लेखनीय आहेत.

1) ताईवान विवाद
2) जपान बरोबर सेनकाऊ व डायूटीव्दिप विवाद
3) ताईवान, व्हिएतनाम, फिलीपाईन्स, ब्रुनई व मलेशियाबरोबर दक्षिण चीन समुद्रात जलक्षेत्र व स्थलाकृती संबंधी विवाद
4) व्हिएतनाम बरोबर सामुद्रिक सीमावाद
5) उत्तर कोरिया, दक्षिण कोरिया, जपान, व्हिएतनाम व फिलीपाईन्स बरोबर मत्स्य शिकार क्षेत्राबाबतचा विवाद

6) जपान बरोबर सामुद्रिक सीमा विवाद

वरील प्रकारचे अनेक सागर क्षेत्रिय देशांबरोबर चीनचे अनेक विवाद असल्यानेच दुरवरच्या सागरक्षेत्राच्या हितांच्या रक्षणासाठी चीनने उच्च सागरीय तंत्रज्ञान विकसित करुन सामरिक व नागरी क्षेत्रात मित्रांची गरज भागविण्यासाठी नौसैनिक सुविधा प्राप्त करण्यासाठी कोणतीही अडचण येऊ दिली नाही. मलाक्का सामरिक क्षेत्राची संवेदना तसेच आशिया क्षेत्रात अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया तसेच भारत यांच्या वाढत असलेल्या मैत्रीपूर्व संबंध, आर्थिक व सामरिक संबंधामुळे चीन पूर्वपणे सावधान आहे. तेच कारण आहे की, चीन आपले तेल व गॅसच्या गरजेला सुरक्षित करण्यासाठी पाकिस्तान, म्यांमार व थायलंड येथून भू-मार्गे पाईप लाईन निर्माणासाठी सक्रिय आहे. चीन हिंदी महासागरात आपल्या उपस्थितीला सुदुढ व प्रभावी बनविण्याचाच परिणाम आहे की, चीनने आपल्या 'String of Pearls' या धोरणाच्या अंतर्गत (ग्वादर) पाकिस्तान, (हम्बनटोटा) श्रीलंका, (चटगाव) बांग्लादेश, म्यामारमध्ये (Sittive, coco Dslavel, Hianggi, Kyakpyn, merrai व Zaddelky), थायलंड Laen Chabang तसेच कंबोडियात Zihanoukville येथे सागरी व सैन्य सुविधा मिळवून आपल्या सागरी सेवेसाठी 'आग्र संक्रियात्मक आधार' (FOB-Forward Operating Bases) स्थापन करुन घेतले आहे. ते फक्त हिंदी महासागरात त्यांच्या व्यापारिक व सामुद्रिक हितांचीच सुरक्षा करेल असे नाही. तर किनारी क्षेत्रात त्याचे राजनैतिक प्रमुख व रणनितीक विस्तारात देखील सहाय्यक होईल. जनरल व्ही. के. मलिकच्या शब्दात Rts warships mag this be used only for navel diplomacy geopolitical presence. PLA navys submanine forces are however more likely to be deployed in the medium terms both during peacetimes and in case of hostilities to deter its adver saries to deter its strategic imports and other operational mission.

हिंदी महासागर क्षेत्रात आपले सामरिक जाळे विस्तृत आणि प्रभावी करण्यासाठी चीनकडून सन 2011 मध्ये सेचेल्स येथे चीनने जो समुद्र आधाराची स्थापना केली त्यावरुन स्पष्ट होते की, चीन सागरावर वर्चस्व निर्माण करण्यासाठी किती व्यस्त आहे. जरी सेचेल्सच्या सरकारने असा दावा केला आहे की, त्याच्या अनुमतीने व इच्छेनुसार चीन या क्षेत्रात सामुद्रीक डकैतीला थांबविण्यासाठी येथे आधार निर्माण करत आहे. परंतु शंघाई स्थित महाविद्यालयाचे प्रोफेसर शेन डिंगलीचे मत आहे की, चीनव्दारे दूरवर स्थित सागरी क्षेत्रात नौसेना आधाराच्या स्थापनेमुळे जागतिक व क्षेत्रिय स्थिरतेलाच मदत होईल. डिंगलीच्याच शब्दात "China needs not only I blue water navy but also overseas military bases to cut the supply costs. This up in the widely accepted world please diplomany, asserting that the establish ment of such military bases over-seas would promote regional & global security"

एवढेच नाही तर किंग्ज कॉलेज, लंडनचे प्रोफ्रसर हर्ष व्ही. पंत यांचे असे मत आहे की, जागतिक शक्तीचा दर्जा प्राप्त केलेला चीन जगातील इतर शक्तींप्रमाणेच शक्ती-प्रक्षेपणाची कोशिश करत आहे. अमेरिकेच्या नौसैन्य आधारांनी घेरला गेलेला चीनचे अमेरिकेला दिले गेलेले असे प्रत्युतर आहे की, जे त्याची जागतिक स्थितीला प्रक्षेपित करते. प्रो. पंतांच्या मतानुसार :

"Chinas now neval strategy of 'far sea defence" is aimed at giving Bejjing the ability to protect its power in key oceavic area, including the most significantly Indian Ocean"

वास्तविक सेचेल्समध्ये सैन्य आधार निर्माण करण्याची चीनची नीती ही संकट काळात हिंदी महासागरात 'चोक-पॉईट' (chock points) वर नियंत्रण करण्याच्या नितीचाचा एक भाग आहे. ज्याव्दारे चीन या क्षेत्रात सामरिक उपस्थितीव्दारे आपल्या आर्थिक हिताच्या रक्षणाकरिता प्रयत्नरत आहे. उल्लेखनीय आहे की, चीनचा तेल आयातीचा जवळ जवळ 80.1 हिस्सा मलाक्का मार्गेच होतो. जरी हिंदू महासागर आणि लाल सागरात आपली सामुद्रिक उपस्थितीव्दारे चीन फक्त आपल्या सागरी हितांची रक्षा करत आहे. तर तो भारतावर नियंत्रण ठेवण्याचा देखील या माध्यमातून प्रयत्न करत आहे.

## निष्कर्ष :

हिंदी महासागरातील चीनच्या सैन्य उपस्थितीने स्पष्ट होते की, येथे एकिकडे चीनला क्षेत्रिय विवादाच्या वेळी त्याच्या रणनितीक कामाला मदत मिळेल तर दुसरीकडे आर्थिक विकासासाठी दूरपर्यंत समुद्रात उपलब्ध आवश्यक प्राकृतीक संसाधने जसे हाईड्रोकार्बन, खनिज व इतर कच्चे पदार्थ इत्यादींची सुरक्षा सुध्दा सुनिश्चित होईल. हेच कारण आहे की, चीनी कंपन्यांनी मंगोला, बांग्लादेश, मिस्त्र, नायजेरिया, सुदान, जिम्बाम्बे व फारसची खाडी क्षेत्रात स्थित राष्ट्रांबरोबर आपले व्यापारी संबंधाच्या विस्ताराला प्राथमिकता दिली आहे. ज्यामुळे प्राकृतिक गॅस संसाधनांव्यतिरिक्त सामरिक उपयोगाच्या व प्लॅटिनम सारख्या पदार्थांना आफ्रिकेकडून आयात करुन आपल्या आर्थिक प्रगतीला प्राधान्य देणे ही चीनची प्राथमिकता आहे. चीन, आफ्रिका फोरम (China Africa Forum) ची स्थापना यादृष्टीने चीनच्या भावी व दुरगामी रणनितीचा भाग आहे. जरी चीनने इरान व सौदी अरेबीयासारख्या पश्चिम आशियाई देशांबरोबर आपल्या रणनितीक संबंधांना दृढ बनविण्यासठी आधार देण्याचा प्रयत्न केला आहे. तरी सुध्दा उपयुकत रणनीतीक संसाधन असलेल्या या क्षेत्रात वाढत असलेल्या मुस्लीम कट्टरपंथीयांच्या प्रभावा तसेच भिन्न जातीय व सामाजिक अस्थिरता आदी कारणांनी चीनची खनिज सुरक्षानीती असंमजस स्थितीत आहे.

हिंदी महासागर क्षेत्रात चीनच्या वाढत चाललेल्या रणनीतक हालचालींमुळे असे वाटते की, सन 2020 पर्यंत चीन सामरिक व राजनैतिक दृष्टीने एवढा प्रभावशाली राष्ट्र म्हणून उदयाला येईल की, तो त्याच्या इच्छेनुसार जेव्हा पाहिजे जेव्हा व जसे पाहिजे तसे किनारी राष्ट्रांमध्ये हस्तक्षेप करण्याच्या स्थितीत असेल. चीनकडून 10 ऑगस्ट 2011 ला आपल्या पहिल्या एअरक्राप्ट करियरच्या जलावतरण तसेच अद्भूत सामर्थ्याने या क्षेत्रात 'गनबोट कुटनिती' चे प्रदर्शन करुन या क्षेत्राील राष्ट्रांच्या हितांवर मोठा आघात करु शकेल. एवढेच नाही तर दक्षिण-चीन सागरी देशांबरोबर (फिलीपाईन्स व्हियतनाम, जपान इ.) सुरु असलेल्या विवादाबरोबर अमेरिकेची या क्षेत्रातील सामरिक उपस्थितीच्या संदर्भात चीनव्दारे जे पाऊले उचलली गेलीत त्यामुळे हिंदी महासागर क्षेत्राला नवीन आयाम मिळू शकतो. यासंदर्भात सी. राजमोहन म्हणतात की,

"China wants to break out of the adverse mantime enviornment that it has faced for so long in wastern pacific. Unlike India which enjoy free access to ocean space, chinas is constratined by a series of islands running south from Japan to the philipines & Taiwan all allies of United States and washingotns imposing forwards naval presence."

**REFERENCE :**


1. Col. M.N. Gulati, Engmatic Tibet, Manas publication, New Delhi, 2005. P- 26
2. Ibid, p-29
3. Tespon W.D. Shakabpa, Tibet : A Political History 1967. P-26
4. Josef Kolmas, Tibet & Imperial China, 1967, p-11
5. Highlights of Tibetian History, Wang Furen & Swo Wening 1984, p-58
6. World Focus, Sept 2010, P-28
7. Yojna, Dec. 2000, p-46
8. Indian Today, Aug 29, 2011, p-42